कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/मनास्प/२०२३–२४/१८३८
दि.२२/११/ २०२३

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीची ७६ वी मराठी 'अ' गट नाट्यस्पर्धा दि.४ डिसेंबर २०२३ पासून सुरू होत असून यंदाच्या स्पर्धेत एकूण १७ नाट्यसंस्था सहभागी झाल्या आहेत. ही स्पर्धा रविंद्र भवन, साखळी यांच्या सहकार्याने पं. मनोहरबुवा शिरगांवकर नाटयगृहात, रोज सायं. ७.०० वाजल्यापासून दि. २६ डिसेंबर २०२३ पर्यंत चालणार आहे.

स्पर्धेच्या नियोजित कार्यक्रमानुसार दि.४ डिसेंबर २०२३ रोजी श्रीची इच्छा थिएटर्स, हरमल–पेडणे या संस्थेच्या प्रल्हाद जाधव लिखित "**शेवंता जित्ती हाय!**" या नाटकाच्या सादरीकरणाने प्रारंभ होत असून दि. ५ डिसेंबर रोजी विजयकुमार नाईक यानी लिहिलेले "**चहा कि कॉफी?**" हे नाटक विजयकुमार्स ट्रॅव्हलींग बॉक्स थिएटर, वारखंडे–फोंडा ही संस्था सादर करणार आहे. वैश्रव क्रिएशन, खोर्ली–म्हापसा या संस्थेच्या वतीने वि. वा शिरवाडकर लिखित "**नटसम्राट**" हे नाटक दि. ६ डिसेंबर रोजी होईल. पिटर व्हाईस यांच्या लेखणीतून साकार झालेले व कौस्तुभ नाईक यांनी अनुवादित केलेले "**संगीत मतीविलय**" हे नाटक दि. ७ डिसेंबर रोजी हंस संगीत नाटय मंडळ, वारखंडे–फोंडा ही संस्था सादर करेल तर दि.८ डिसेंबर रोजी संजीव रामकृष्ण बर्वे यांच्या लेखणीतून साकार झालेले "**तुळशीपत्र**" हे नाटक विकास मंच सोशल क्लब, वाळपई–सत्तरी ही संस्था सादर करणार आहे. दि.९ डिसेंबर रोजी अमर प्रसादी यांच्या लेखणीतून उतरलेले "**अहम प्रश्मास्मि**" या नाटकाचा प्रयोग भुमिका थिएटर, साळ–डिचोली ही संस्था सादर करणार आहे. मोरजी पंचायतन कला संस्था, मोरजी–पेडणे ही संस्था नारायण आशा आनंद यांच्या लेखणीतून साकार झालेल्या **'अकबर किस्तांव जाता?"** हे नाटक दि.१० डिसेंबर रोजी सादर करेल.

दि.११ डिसेंबर २०२३ रोजी बाळसती नाटयकला संघ, सुकतळी–धारबांदोडा ही संस्था अजित दळवी लिखित "**डॉ. तुम्ही सुध्दा**" हे नाटक सादर करणार असून दि. १४ डिसेंबर रोजी फलोरीयन झेलर यांच्या लेखणीतून साकार झालेले व डॉ. समीर नारायण मोने यांनी अनुवादित केलेले "**फादर**" हे नाटक मांगिरीश युथ क्लब, मंगेशी–फोंडा ही संस्था सादर करणार आहे. अभय थिएटर अकादमी गोवा, पाळी–सुर्ला या संस्थेच्या वतीने मिलींद फाटक लिखित "**व्हाईट लिली ॲण्ड नाईट रायडर्स**" हे नाटक दि.२० डिसेंबर रोजी होईल तर दि.२१ डिसेंबर रोजी इरफान मुजावर यांच्या लेखणीतून साकार झालेले "**सलवा जुडूम**" हे नाटक ओम कला सांस्कृतिक केंद्र, हळर्ण–पेडणे ही संस्था सादर करणार आहे. दि.२२ डिसेंबर रोजी डॉ. प्रकाश वझरीकर यांच्या लेखणीतून उतरलेल्या "**रुदन**" या नाटकाचा प्रयोग रसरंग, उगवे ही संस्था सादर करणार आहे. रुद्रेश्वर, पणजी ही संस्था प्रसाद कळंगुटकर लिखित "**शेवटची फेरी**" हे नाटक दि.२३ डिसेंबर रोजी सादर करेल. तर दि. २५ डिसेंबर रोजी जोसेफ केसरकिंग यांच्या लेखणीतून उतरलेल्या व तेजस कुलकर्णी यांनी अनुवादित केलेले "**आ कारिसा विनिनोसा**" या नाटकाचा प्रयोग श्री सातेरी कलामंच, मोर्ले–सत्तरी ही संस्था सादर करणार आहे.

दि.२६ डिसेंबर २०२३ रोजी स्पर्धेचा समारोप श्री नागेश महालक्ष्मी प्रासादिक नाटयसमाज, बांदिवडे–फोंडा या संस्थेच्या दत्ताराम कामत बांबोळकर यांनी लिहिलेले **"यत् न कथ्यते"** या नाटकाने होणार आहे.

स्पर्धेतील सर्व नाटयप्रयोग रोज सायं.७.०० वाजता रविंद्र भवन, साखळी येथे होणार असून रु.५०/–च्या प्रवेशिका रविंद्र भवन, साखळीच्या तिकिट काऊंटरवर उपलब्ध असतील याची नाटय रसिकांनी नोंद घ्यावी असे कला अकादमीने कळवले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

एसझेड/एसजी